# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट १७-२३** **दिनांक १५/०१/२०२३**

## १४,५००/- रुपये किंमतीचा प्रतिबंधित नायलॉन मांजा विक्रीकरीता साठवुन ठेवलेल्या इसमांवर तुळींज पोलीस ठाणे गुन्हे, प्रकटीकरण पथकाची कारवाई.

शासनाच्या आदेशान्वये नायलॉन मांजाचे उत्पादन, विक्री व साठवणुकीवर बंदी घालण्यात आली होती. त्याअनुषंगाने मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात नायलॉन मांजाचे उत्पादन, विक्री व साठवणुकीवर बंदी घालण्याबाबत मनाई आदेश निर्गमित करुन वृत्तपत्र, सोशल मिडीयावर प्रसारित करण्यात आला होता. प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना दिनांक १४/०१/२०२३ रोजी गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने संतोषभवन, सिताराम नगर, नालासोपारा पुर्व येथील जय हनुमान इलेक्ट्रॉनिक स्टोअरमध्ये प्रतिबंधित नायलॉन मांजा विक्री करीत असल्याची माहिती मिळाल्याने गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सदर ठिकाणी पंचासह जावुन पाहणी केली असता दुकान मालक नामे शिवकुमार कल्पनाथ राजभर यांना ११,५००/- रुपये किंमतीचे प्रतिबंधित असलेला के कोब्रा कंपनीचा ४६ रिल नायलॉन मांजा विक्री करण्याकरीता साठवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्याने सदरचा मांजा जप्त करुन सदरबाबत तुळींज पोलीस ठाणेत गु.रजि.नं. ३६/२०२३ भा.द.वि.सं. कलम १८८,२९०,२९१ सह पर्यावरण अधिनियम ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच यापुर्वी दिनांक ०९/०१/२०२३ रोजी मोरेगांव भागात नायलॉन मांजा विक्री करणारा एक विधिसंघर्षीत बालक व एक महिला विक्रेता यांचेकडुन एकुण ८ कुंफु पांडा कंपनीचा नायलॉन मांजा किंमत १६००/- रुपये , तसेच ५ रिल नायलॉन मांजा १४००/- रुपये किंमतीचा नायलॉन मांजा विक्री करताना मिळुन आल्याने एकुण २ गुन्हे दाखल करण्यात आलेले होते. अशा प्रकारे एकुण ०३ गुन्हे दाखल करुन कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२ वसई, तथा आति. कार्यभार परिमंडळ ०३, विरार, श्री. चंद्रकांत जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. शैलेंद्र नगरकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तुळींज पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/ मिथुन म्हात्रे, पोउनिरी/ बाळासाहेब बांदल, सहा.पो.उप.निरी/ शिवानंद सुतनासे, पो.हवा./ आनंद मोरे, उमेश वरठा, आशपाक जमादार, पांडुरंग केंद्रे, पो.अंम. छपरीबन,राऊत यांनी केली आहे.

-------oooo-------